# -:प्रेस नोट:-

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर येथील वरिष्ठ सहायक व वरिष्ठ लिपीक यांचे विरूध्द ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर ची कारवाई

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर येथील १) श्री. अशोक बाबुरावजी बगुलकर, वय ५८ वर्षे, वरिष्ठ सहाय्यक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर (वर्ग ३) २) श्री. दिपक केशवराव सज्जनवार, वय ३६ वर्षे, वरिष्ठ लिपीक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर (वर्ग ३) यांचे विरूध्द १०,०००/— रूपये मागणी करून स्विकारल्या संबंधाने ॲन्टी करप्शन ब्युरो चंद्रपूर यांचे पथकाने आज रोजी कार्यवाही केली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, यातील तक्रारदार ही मौजा वेडाबाई, ता. वणी, जि. यवतमाळ येथील रहीवासी असुन एस.टी. महामंडळ चंद्रपूर येथे चालक पदावर नोकरीस आहेत. तक्रारदार यांचे माहे मार्च २०२२ मध्ये बंगाली कॅम्प चंद्रपूर येथे अपघात झाल्याने त्यांच्या पायात रॉड टाकण्यात आलेला होता, काही दिवसानंतर पायात टाकलेल्या रॉडचे स्क्रू तुटून पायात पायजन झाले असल्यामुळे त्यांनी एम्स हॉस्पिटल नागपूर येथे उपचार केला होता. सदर उपचारादरम्यान तक्रारदार हे रजेवर होते. उपचार केल्यानंतर तक्रारदार यांना ड्युटीवर रुजू होण्याकरता वैद्यकीय अधिकारी यांचे वैद्यकीय प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने ते माहे जुन २०२४ मध्ये जिल्हा सामान्य रुग्णास चंद्रपूर येथे तपासणी करीता गेले, तपासणी करून फिट फार लाईट डयुटी एक्सपेक्ट ड्रायव्हिंग असा शेरा नमूद करून वैद्यकीय अहवाल कार्यालयात सादर केला होता. परंतु वैद्यकीय अहवालामध्ये ते चालक पदाची कामगिरी करण्याबाबत स्पष्ट नमूद नव्हते, त्यामुळे तक्रारदार यांनी वैद्यकीय मंडळ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चंद्रपूर येथे वैद्यकीय अहवाल देण्याबाबत अर्ज केला होता. त्यानंतर तक्रारदार हे वैद्यकीय महाविद्यालय येथील वरिष्ठ सहायक आलोसे क्र १ श्री बगुलकर यांना वारंवार भेटून वैद्यकीय अहवाल देण्याबाबत विनंती केली परंतु त्यांनी तक्रारदार यांना वैद्यकीय अहवाल देण्यास टाळाटाळ करीत होते. त्यानंतर दि. १८/०६/२०२४ रोजी आलोसे क्रं. १ बगुलकर यांनी तुला लगेच वैद्यकीय मंडळाचे अहवाल पाहिजे असल्यास १०,०००/— रुपये माझेकरीता द्यावे लागतील नाहीतर तुझे काम होणार नाही असे म्हणून लाच रकमेची मागणी केली.

परंतु तक्रारदार यांना आलोसे क्र. १ श्री बगुलकर यांना लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर येथे येवुन दिनांक १९/०६/२०२४ रोजी तक्रार नोंदविली. प्राप्त तक्रारीवरून दिनांक १९/०६/२०२४ रोजी पोलीस उपअधीक्षक श्रीमती मंजुषा भोसले यांनी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची गोपनीयरित्या शहानिशा करून पडताळणी/सापळा कारवाईचे आयोजन केले. त्यामध्ये पडताळणी कार्यवाहीदरम्यान आलोसे २) श्री. दिपक केशवराव सज्जनवार यांनी तक्रारदार यांचे वैद्यकीय अहवाल देण्याचे कामाकरीता १०,०००/— रूपये आलोसे क्र. १) श्री. अशोक बाबुरावजी बगुलकर यांना देण्यास प्रोत्साहन देवुन आलोसे क्र. १ यांना पैसे स्विकारण्याबाबत फोनद्वारे विचारणा केली असता त्यांनी आरोपी क्रमांक २ यांनाच तक्रारदार याचेकडून लाच रक्कम स्वीकारण्यास सांगितले. त्यावरून आरोपी क्रमांक २ यांनी आरोपी क्रमांक १ यांचेकरिता लाच रक्कम मागणी करून स्वीकारण्याची तयारी दर्शविली.

त्यावरून आज दि. १९/०६/२०२४ रोजी हॉटेल सेलिब्रेशन, दाताला रोड चंद्रपूर या हॉटेलच्या बाजुला असलेल्या रोमा इलेक्ट्रिकल दुकासमोर पंचासमक्ष सापळा कार्यवाही दरम्यान आलोसे क्र. २ दिपक सज्जनवार यांनी १०,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर आलोसे क्रमांक २ यांनी फोनवरून आलोसे क्र १ यास लाच रक्कम स्वीकारले बाबत सांगितले असता आलोसे क्रं १ अशोक बगुलकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याने त्यांना सुध्दा ताब्यात घेण्यात आले असुन पुढील तपास कार्य सुरू आहे.

सदरची कार्यवाही श्री. राहुल माकणीकर,पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर, श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला. प्र.वि. नागपूर यांचे मार्गदर्शनात पोलीस उपअधीक्षक श्रीमती मंजुषा भोसले, सफौ रमेश दुपारे, पोहवा नरेशकुमार नन्नावरे, रोशन चांदेकर, हिवराज नेवारे, पोशि अमोल सिडाम, प्रदिप ताडाम, म.पो.शि. मेघा मोहुर्ले सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर तसेच चापोशि रवि तायडे, मो.प.वि. चंद्रपूर यांनी यशस्वी पार पाडली आहे. हॅश व्हॅल्यु घेण्यात आलेली आहे.

सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की,त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ आमचेशी संपर्क साधावा.

- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय नागपूर दुरध्वनी क्रमांक :— ०७१२—२५६१५२०
  श्री. राहुल माकणीकर, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
  श्री. संजय पुरंदरे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. नागपूर
- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक :— ०७१७२—२५०२५१
  टोल फ्रि क्रमांक :— १०६४
  श्रीमती मंजुषा भोसले, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :— ९३२२२५३३७२
  श्री. जितेंद्र गुरनुले, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. चंद्रपूर :— ८८८८८५७१८४

**Website: www.acbmaharashtra.gov.in**

मंजुषा म. भोसले
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर